# संरक्षण उत्पादनाने गाठला १.५१ लाख कोटींचा विक्रमी टप्पा

## भारताची ऐतिहासिक कामगिरीबाबत संरक्षण मंत्री सिंग यांची माहिती

**नवी दिल्ली –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत या महत्त्वाकांक्षी संकल्पनेला संरक्षण क्षेत्रात मोठे यश मिळाले आहे. भारताचे वार्षिक संरक्षण उत्पादन आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १ लाख ५० हजार ५९० कोटी रुपयांच्या (सुमारे १.५१ लाख कोटी रुपये) अभूतपूर्व पातळीवर पोहोचले आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी ही घोषणा केली.

ही वाढ केवळ देशाच्या संरक्षण सिद्धतेसाठीच नव्हे, तर भारताला एक जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, हे यश आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत संरक्षण उत्पादनातील स्वयंपूर्णतेच्या वाढत्या गतीचे आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहे. संरक्षण उत्पादनातील हा विक्रमी आकडा गेल्या आर्थिक वर्षाच्या (२०२३-२४) तुलनेत तब्बल १८ टक्क्यांची मजबूत वाढ दर्शवतो. गेल्या वर्षी हे उत्पादन १.२७ लाख कोटी रुपये होते. मात्र, सर्वात लक्षणीय बाब म्हणजे गेल्या पाच वर्षांतील वाढ. आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये जे उत्पादन केवळ ७९,०७१ कोटी रुपये होते, त्यात आता तब्बल ९० टक्क्यांची वाढ झाली आहे.

या कामगिरीबद्दल संरक्षण उत्पादन विभाग, संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (उझडणी) आणि खाजगी उद्योगांच्या एकत्रित प्रयत्नांचे संरक्षणमंत्र्यांनी कौतुक केले. त्यांनी म्हटले की, हा वाढता आलेख भारताच्या संरक्षण औद्योगिक पायाच्या मजबुतीचे स्पष्ट द्योतक आहे. या एकूण उत्पादनात संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि इतर सार्वजनिक उपक्रमांचा वाटा सुमारे ७७ टक्के आहे, तर खाजगी क्षेत्राचे योगदान २३ टक्के राहिले आहे. विशेष म्हणजे, खाजगी क्षेत्राचा सहभाग सातत्याने वाढत आहे.

### भविष्यातील दिशा

- संरक्षण उत्पादनातील ही विक्रमी कामगिरी भारताच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. सरकारचे सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ, खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग आणि निर्यातीची वाढती क्षमता पाहता, भारताचे संरक्षण उत्पादन क्षेत्र येत्या काळात आणखी वेगाने प्रगती करेल, असा विश्वास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. या यशामुळे भारत केवळ आपल्या संरक्षण गरजांसाठी आत्मनिर्भर होणार नाही, तर मित्र राष्ट्रांना संरक्षण सामग्री निर्यात करणारा एक प्रमुख देश म्हणूनही उदयास येईल.

# मला पंतप्रधान व्हायचंय चिमुकलीची मोदींकडे मागणी

**नवी दिल्ली–** देशभरात शनिवारी रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. दिल्लीतील शाळकरी विद्यार्थीनींनी पंतप्रधान निवासस्थानी जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना राखी बांधली. चिमुकल्या विद्यार्थीनींनी पंतप्रधान मोदींसाठी विशेष राख्या आणल्या होत्या.या विशेष रक्षाबंधन कार्यक्रमाचा एक व्हिडीओ पंतप्रधान मोदींनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केला. व्हिडीओमध्ये चिमुकल्यांसोबत पंतप्रधान मोदी संवाद साधताना दिसत आहेत. त्यांनी सर्व विद्यार्थिनींना रक्षाबंधनच्या शुभेच्छा दिल्या. एक चिमुकली मला पंतप्रधान व्हायचे आहे, असे पंतप्रधान मोदींना सांगताना दिसत आहे.

## दिल्लीतील रुग्णालयात अग्नीतांडव

**नवी दिल्ली –** दिल्लीतील कॉसमॉस रुग्णालयात शनिवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. दिल्ली अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयात खूप धूर झाल्यानंतर काच फोडून ११ रुग्णांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं. ऑक्सिजन सिलिंडर वेळेवर बाहेर काढण्यात आले, अन्यथा मोठी दुर्घटना घडू शकली असती. आग लागल्यानंतर अमित नावाच्या एका हाऊसकीपिंग स्टाफने स्वतःला रुग्णालयाच्या बाथरूममध्ये कोंडून घेतलं होतं, ज्यामुळे त्याचा गुदमरून मृत्यू झाला आहे. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. आनंद विहारमधील कॉसमॉस हॉस्पिटलमध्ये जॉइंट रिप्लेसमेंट आणि ट्रॉमा मॅनेजमेंटशी संबंधित मेडिकल ट्रीटमेंट होते.

## मंदिराची भिंत पडून आठ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली –** राजधानी दिल्लीतील हरिनगरमध्ये शनिवारी पावसादरम्यान भिंत कोसळल्याने एक अपघात झाला. जैतपूर पोलिस स्टेशनच्या हरिनगरमधील बाबा मोहन राम मंदिराजवळील समाधी स्थळाची भिंत कोसळल्याने सुमारे आठजण गाडले गेले. या अपघातात सर्व आठ जखमींचा मृत्यू झाला आहे. अपघातातील आठ जणांमध्ये तीन पुरुष, दोन महिला, दोन मुली आणि एक मुलगा आहे. सात जणांच्या मृत्यूनंतर, जखमी हाशिबुलवर रुग्णालयात उपचार सुरू होते. त्याचाही मृत्यू झाला आहे.

# अमेरिकन न्यायालयांना डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**न्यूयॉर्क –** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, अनेक देशांवर लादलेल्या शुल्काचा शेअर बाजारावर खूप चांगला परिणाम होत आहे. परंतु जर कोणत्याही न्यायालयाने शुल्क रोखण्याचा प्रयत्न केला तर ते पुन्हा एकदा अमेरिकेला महामंदीकडे ढकलू शकते असे म्हटले आहे. हे सांगताना त्यांनी अमेरिकेत महामंदीचा येण्याचा इशारा देत तेथील न्यायालयांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अनेक देशांवर शुल्क लादले आहे. यामध्ये भारतावर लादलेल्या ५० टक्के शुल्काचाही समावेश आहे. यापैकी २५ टक्के शुल्क लागू करण्यात आले आहे तर उर्वरित २५ टक्के शुल्क २७ ऑगस्टपासून लागू केले जाईल. ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये, शुल्कांचा अमेरिकन शेअर बाजारावर सकारात्मक परिणाम होत आहे आणि जवळजवळ दररोज नवीन विक्रम होत आहेत. अमेरिकेच्या तिजोरीत शेकडो अब्ज डॉलर्स येत आहेत परंतु जर यावेळी कोणत्याही डाव्या न्यायालयाने शुल्काविरुद्ध निर्णय दिला तर अमेरिका इतकी मोठी रक्कम आणि त्याचा प्रभाव गमावेल. ट्रम्प यांनी अमेरिकेत १९२९ सारख्या महामंदीचा इशारा दिला.

### अमेरिकेच्या न्यायालयात सुनावणी सुरू

- ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा अमेरिकेतील न्यायालय आपत्कालीन शक्तींचा वापर करून मित्र राष्ट्रांवर लादलेल्या शुल्काच्या खटल्याची सुनावणी करत आहे. या वर्षी मे महिन्यात अमेरिकेच्या एका खालच्या न्यायालयाने ट्रम्पच्या शुल्काविरुद्ध निर्णय दिला होता, परंतु अपीलीय न्यायालयाने त्या निर्णयाला स्थगिती दिली होती.

### अमेरिकेत वाढत्या महागाईची चिंता

- अमेरिकेतील अनेक अर्थतज्ज्ञांना चिंता आहे की, शुल्क लादल्याने महागाई वाढू शकते आणि त्याचा गुंतवणुकीवरही परिणाम होऊ शकतो. ट्रम्प यांचे राजकीय विरोधक म्हणतात की अमेरिकन संविधानानुसार, कोणत्याही देशातून आयातीवर शुल्क लादण्यासाठी काँग्रेसची संमती आवश्यक आहे.

# राज्यमंत्री अजूनही अधिकारांच्या प्रतीक्षेत

## अधिकारांसाठी कदम यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील सहा राज्यमंत्री अद्याप वैधानिक अधिकारांच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या आठ महिन्यांपासून कॅबिनेट मंत्र्यांनी संबंधित राज्यमंत्र्यांना त्यांचे अधिकार बहाल केलेले नाहीत. राज्यमंत्र्यांना अधिकार न मिळाल्याने बैठका आयोजित करणे, अधिकाऱ्यांना निर्देश देणे यावरून कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यात खटके उडत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यमंत्री योगेश कदम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून राज्यमंत्र्यांना नियमानुसार अधिकार देण्याची मागणी केली आहे.

फडणवीस सरकारचा पहिला मंत्रिमंडळ विस्तार गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात नागपूरला झाला. फडणवीस मंत्रिमंडळात भाजपचे तीन, शिवसेना शिंदे गटाचे दोन तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा एक असे मिळून सहा राज्यमंत्री आहेत. मात्र, विधिमंडळ अधिवेशनात सरकारच्या वतीने उत्तर देण्याच्या पलिकडे राज्यमंत्र्यांना फार काही काम नाही. त्यामुळे राज्यमंत्री नाराज आहेत. मध्यंतरी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात शासकीय बैठका आणि अधिकारांवरून संघर्ष उडाला होता. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांना हस्तक्षेप करावा लागला होता. कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यात अधिकारांवरून रस्सीखेच सुरू असल्याने ती थांबवण्यासाठी अधिकारांचे वाटप करण्याची मागणी राज्यमंत्र्यांनी फडणवीस यांच्याकडे केली आहे.-

## वाट पाहू नका, तपास सुरु करा

**नवी दिल्ली –** लोकसभा निवडणुकीतील बोगस मतदार प्रकरणावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांना आता माजी मुख्य निवडणूक आयुक्त ओ.पी. रावत यांचा देखील पाठिंबा मिळाला आहे. रावत यांनी स्पष्ट केलं, बेंगळुरुमधील कथित बोगस मतदारांबाबत गांधींनी केलेल्या आरोपांची निवडणूक आयोगाने चौकशी करायला हवी. त्यासाठी आयोगाने कोणत्याही तक्रारीची वाट न पाहता तपास सुरू करायला हवा असा सल्ला रावत यांनी दिला आहे.

# मनोज जरांगे नगरमध्ये दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – मराठा समाज आरक्षासाठी लढा देणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हे मुंबई येथे होत असलेल्या २९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या पाश्वभूमीवर बैठकीनिमित्त शनिवारी (दि . ९) रात्री ९ वाजता अहिल्यानगरला मुक्कामी आले. दरम्यान यावेळी बीड जिल्ह्यातील मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी यांनी जरांगे पाटील यांना रक्षाबंधनानिमित्त राखी बांधून त्यांचे औक्षण केले.

शनिवारी रात्री ९ वाजता नगरच्या शासकीय विश्रामगृहावर जरांगे पाटील यांचे आगमन झाले. राज्यभर गाजत असलेल्या महादेव मुंडे खुन प्रकरणी जरांगे पाटील यांनी लक्ष घातलेले आहे. मयत मुंडे यांच्या पत्नी यांनी जरांगे पाटील यांना नगरला येवून राखी बांधत त्यांचे औक्षण केले. दरम्यान, आज रविवारी (दि. १०) रोजी दिवसभर अहिल्यानगर येथे जरांगे पाटील २९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या पाश्वभूमीवर समाजातील नागरिकांशी चर्चा करणार आहेत.



पान १ वरुन

## मतचोरीवर पवार, फडणवीस भिडले

पत्रकार परिषद घेतली. त्यात अतिशय कष्ट करून सफल अभ्यास करून त्याची मांडणी करण्यात आली. गांधी यांनी बोगस मतदानाची विविध उदाहरणे दिली. केवळ उदाहरणे दिली नाहीत, तर त्याचा आधारही दाखवण्यात आला. पण आज निवडणूक आयोगाने त्याचा वेगळा अर्थ लावण्याचे ठरवलेले दिसते. त्यांनी राहुल गांधी यांना चर्चेचे निमंत्रण दिले. पण ते देताना शपथपत्र देण्याची अट घातली. निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था आहे. राहुल गांधी यांनी सांगितले की, मी संसदेत सदस्य होताना मी शपथ घेतली आहे. त्यामुळे आता शपथ घेण्याची गरज नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने शपथपत्र मागण्याचा धरलेला आग्रह योग्य नाही असे माझ्यासारख्या व्यक्तीला वाटते, असे ते म्हणाले. राहुल गांधी यांनी जे प्रझेंटेशन केले, त्या प्रकरणी खोलात जाण्याची गरज आहे. घटनात्मक लोकशाहीविषयी लोकांच्या मनात शंका निर्माण होणे योग्य नाही. त्यामुळे याची सखोल चौकशी झाली पाहिजे. दूध का दूध पाणी का पाणी झाले पाहिजे हा आमचा आग्रह आहे, असे शरद पवार म्हणाले.

दरम्यान, पवार यांना उत्तर देतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आजपर्यंत राहुल गांधी यांनी अनेकदा ईव्हीएम मशीनबाबत शंका उपस्थित केली असली तरी शरद पवार तसं कधीच बोलले नव्हते. किंबहुना शरद पवार यांनी अनेकदा स्पष्ट भूमिका घेतली होती की, ईव्हीएमला दोष देणे अयोग्य आहे. मात्र, आता गांधी यांच्या भेटीनंतर शरद पवार अचानक मतदान प्रक्रियेतील फेरफाराविषयी बोलू लागले आहेत. हा राहुल गांधी यांच्या भेटीचा परिणाम दिसतोय, असे सांगत फडणवीस म्हणाले, विरोधकांनी कितीही संभ्रम निर्माण केला तरी भारता इतक्या पारदर्शक आणि मुक्त पद्धतीने निवडणुका कुठेच होत नाहीत. ईव्हीएम आणि निवडणूक आयोग यांच्यावर आरोप करणारी मंडळी जनतेत बोलतात. पण निवडणूक आयोगाने बोलावल्यावर जात नाहीत. शपथपत्र द्यायला तयार नाहीत. सांगतात आम्ही संसदेत शपथ घेतली आहे. पण संसदेतील शपथ सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात चालते का? त्यांना माहिती आहे की, आपलं खोटं पकडलं गेलं तर उद्या तुमच्यावर फौजदारी कारवाई होऊ शकते. त्यामुळे रोज खोटं बोलायचं आणि पळून जायचं, असे हे पळपुटे लोक आहेत, अशी टीका फडणवीस यांनी केली. मला एक गोष्ट लक्षात येत नाही, इतक्या दिवसांनी पवार यांनी राहुल गांधी यांना भेटल्यावरच या सगळ्याची आठवण का आली ? इतके दिवस पवार काहीही बोलले नाहीत, आज अचानक बोलले. गांधी ज्याप्रमाणे सलीम जावेदच्या कहाण्या तयार करुन त्यांच्या स्क्रिप्टवर रोज कपोलकल्पित कहाण्या सांगत आहेत, तशाच प्रकारची अवस्था पवार साहेबांची झाली नाही ना, असे फडणवीस यांनी म्हटले.

### आयोगाने उत्तर द्यावे, फडणवीसांनी नाही

- शरद पवारांनी यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मतदार याद्यांतील घोळाविषयी व्यक्त केलेली भूमिकाही फेटाळून लावली. माझे म्हणणे फक्त एकच आहे की, आक्षेप कुणाबद्दल आहे? आम्ही मुख्यमंत्र्यांवर आक्षेप घेतला नाही. आमचा आयोगावर आक्षेप आहे. त्यामुळे निवडणूक आयोगावर आक्षेप घेतल्यानंतर भाजप किंवा मुख्यमंत्र्यांनी आपले मत मांडायला पुढे येण्याची गरज नाही. आम्हाला उत्तर निवडणूक आयोगाकडून हवे आहे, इतर कुणाकडूनही नाही. आम्ही स्वस्थ बसणार नाही. याचा निकाल घ्यावाच लागेल. आमची माहिती चुकीची असेल तर ते देशाला सांगितले पाहिजे. पण नसेल तर जे काही सत्य आहे ते पुढे आले पाहिजे, असे शरद पवार म्हणाले.

### निवडणूक आयोगाची जबाबदारी : थोरात

- अलीकडच्या काळातील निवडणुका संशयास्पद होत आहेत. राहुल गांधीं यांनी मतांमधील तफावतीवर जे मांडलं त्याचं उत्तर निवडणूक आयोग देऊ शकलं नाही. हरियाणा पुन्हा भाजपकडे जातं, हे कसं होऊ शकतं? शंका घेण्यासाठी अनेक जागा आहेत, शंकांचं निरसन करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे, मात्र निवडणूक आयोग उत्तर देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. शरद पवारांनी सांगितल्याप्रमाणे असे काही एजंटच फिरत असतील, तर ईव्हीएमसंदर्भातही प्रश्न निर्माण होतो. मतदानावर लोकशाही चालते, त्या मतदानावरच शंका निर्माण होत असेल तर ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे, असं ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.

## दोन चिमुकल्यांसह आईची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

मुलीस विहिरीकडे घेऊन गेली व मुलांसह विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. पती व सासरे शेतातून घरी आले असता त्यांना रुपाली व दोन्ही मुले घरी दिसून आले नाहीत. यावेळी त्यांनी आजुबाजुला शोध घेतला. दरम्यान, त्यांना शेजारील विहिरीच्यावर चप्पल दिसून आल्या, त्यानंतर आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांच्या मदतीने विहिरीत बोरीच्या काटाड्या टाकून रात्री उशिरा तिन्ही मृतदेह बाहेर काढण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच खर्डा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक उज्वल राजपूत पोलीस पथकासह तातडीने घटनास्थळी पोहोचले. मृतदेहांना शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. घटनास्थळी ग्रामस्थ आणि माहेरकडील नातेवाईकांची गर्दी जमली होती. आत्महत्येचे नेमकं कारण समजू शकले नाही. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राजपूत करत आहेत.

## पावसाचा यंदा ५२ दिवस खंड

तर जुलै महिन्यांत पावसाची सरासरी ही ९७.५ असतांना असतांना प्रत्यक्षात अवघा ६१ मि.मी. पाऊस झालेला आहे. दोन पावसात मोठा खंड पडल्याने जिल्ह्यात खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहे.

दुसरीकडे गेल्या दोन दिवसापासून मुळा, भंडादरा, निळवंडे यासह दक्षिण जिल्ह्याला वरदान असणाऱ्या पुणे जिल्ह्यातील धरण परिसारात पावसाने उघडीप घेतली आहे. यामुळे धरणातील पाणी साठा देखील रोडावला आहे. दरवर्षी १५ ऑगस्टला भंडारदरा धरण ओव्हरफ्लो होत असते. यंदा ते होणार की नाही, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. सध्या मुळा व भंडारदरा धरणात ९० टक्क्यांच्या पेक्षा अधिक पाणीसाठा ही जमेची बाजू आहे. जिल्ह्यात रक्षाबंधनानंतर पावसाला सुरूवात होणार असल्याचे हवामान तज्ज्ञांकडून सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात पावसाला पोषक वातावरण असतांना ही पाऊस होतांना दिसत नाही. यामुळे शेतकरी चिंतेत दिसत आहेत. जिल्ह्यात पावसात मोठा खंड पडल्याने खरीप हंगाम आणि त्यानंतर रब्बी हंगामाचे काय होणार असा प्रश्न आता शेतकऱ्यांसमोर दिसत आहे.

### आतापर्यंतचा पाऊस

- नगर १४८.९ मि. मी. (३१ टक्के), पारनेर १६८.६ मि.मी. (४० टक्के), श्रीगोंदा १६७.६ मि.मी. (४१.६ टक्के), कर्जत १६७.८ मि.मी. (४०.९ टक्के), जामखेड १८२.९ मि.मी. (२९.१ टक्के), श्रीगोंदा १४४.६ मि.मी. (३१.२ टक्के), पाथर्डी १३४.९ मि.मी. (२८.५ टक्के), नेवासा १२१.८ मि.मी. (२८.३ टक्के), राहुरी १३३.२ मि.मी. (३०.८ ), संगमनेर १५५.१ मि.मी. (४४.२ टक्के), अकोले २५५.९ मि.मी. (५२.४ टक्के), कोपरगाव १३४.९ मि.मी. (३३.४ टक्के), श्रीरामपूर १०४.९ मि.मी. (२२.७ टक्के) आणि राहाता १४५.४ मि.मी (३२ टक्के) असा आहे.

## ५ लढाऊ विमानांसह पाकिस्तानचे एअरक्राफ्ट उडवले

क्षेत्रावरील हल्ल्याचा निर्णय अत्यंत अचूक गुप्त माहितीनुसार घेतला गेला. मुख्य इमारतीवरही हल्ला करण्यात आला, जी काही वेळा नागरी टर्मिनल म्हणूनही वापरली जात होती. आम्ही लहानपणापासून अशा दिवसांची स्वप्ने पाहिली होती. निवृत्तीपूर्वीच मला हे साध्य करण्याची संधी मिळाली. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानच्या हवाई क्षमतेला मोठा धक्का बसला असून, तज्ज्ञांच्या मते हा भारताच्या वायूसेनेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी हल्ला ठरला आहे.

## 'महाराष्ट्र मेड लिकर' करणार सरकारी तिजोरीवरील भार हलका

२०२५-२६ मध्ये राज्यावर ९.३२ लाख कोटींच्या कर्जाचे ओझे राहणार आहे. त्यासाठी महायुती सरकार महसूल वाढवण्याचे आणि लाडकी बहीण सारख्या योजनांचा आर्थिक भार सहन करण्यासाठी नवीन मार्ग शोधत असल्याचे दिसून येते. यामुळे राज्य सरकारने महसूल वाढीच्या उद्देशाने धान्यावर आधारित नवीन मद्य प्रकार आणण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने जानेवारीमध्ये स्थापन केलेल्या समितीने महाराष्ट्र निर्मित मद्याचा म्हणजेच एमएमएल सुरू करण्याची सूचना केली होती. अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने एप्रिलमध्ये अहवाल सादर केला. या अहवालास राज्य मंत्रिमंडळाने १० जून रोजी मंजुरी दिली होती. या समितीच्या शिफारशींवर आधारित सरकारी आदेशातील माहितीनुसार, धान्यांपासून निर्मिती केलेल्या राज्य ब्रँडची किंमत १८० मिलीसाठी किमान १४८ रुपये असेल. याचा उद्देश देशी आणि विदेशी मद्याच्या किमतीतील तफावत भरून काढण्याचा आहे.

राज्य सरकारला एमएमएल हा एक विशेष ब्रँड तयार करायचा आहे. तसेच देशात इतर ठिकाणी त्याचे उत्पादन घेण्यास बंदी असेल. या आदेशानुसार, देशी मद्य, भारतीय बनावटीचे विदेशी मद्य, बिअर आणि वाईन यासारख्या इतर कोणत्याही मद्य प्रकारात त्याचे उत्पादन घेता येणार नाही. पीएलएल परवान्यासाठीचे नोंदणीकृत मुख्यालयदेखील महाराष्ट्रातच असणार आहे. जी पीएलएल परवानाधारक कंपनी आहे तिची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे विदेशी गुंतवणूक नसावी. कंपनीचे किमान २५ टक्के प्रमोटर्स अथवा परवानाधारक महाराष्ट्राचे कायमचे रहिवासी असणे गरजेचे आहे. जर नोंदणीकृत परवानाधारक महाराष्ट्रात आणि इतर राज्यांत विदेशी मद्याचे उत्पादन घेत असेल, तर सदर परवानाधारक राज्य निर्मित मद्य परवान्यासाठी पात्र असणार नाही, असे आदेशात स्पष्ट केले आहे.

### २२ मद्य निर्मिती उद्योग बंद

- हा निर्णय महाराष्ट्रातील ७० पीएलएल युनिट्सना चालना देण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे. यातील २२ पूर्णपणे बंद आहेत, तर १६ युनिट्स उत्पादन घेत नाहीत. ते केवळ त्यांच्या दुकानांमधून मद्य विक्रीच्या परवानगीसाठी परवान्याचे नुतनीकरण करत आहेत. उर्वरित ३२ युनिट्स मद्य निर्मिती करतात. त्यापैकी १० उद्योग ७० टक्के भारतीय बनावटीच्या मद्याचे उत्पादन घेतात.

### देशमुख सरकारची योजना

- राज्य सरकारने धान्यावर आधारित मद्य निर्मिती करण्याचा निर्णय घेण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी २००७ मध्ये, विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील सरकारने धान्यावर आधारित डिस्टिलरीजना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने धान्यावर आधारित डिस्टिलरी आणि एकात्मिक युनिट नावाची योजना सुरू केली होती.

## लाडकी बहीण योजना पाच वर्षे सुरूच राहणार

आहे. बहीण भावावरचे प्रेम यातून व्यक्त होते. या धाग्यातून भाऊ बहिणीच्या रक्षणाची शपथ घेतो. मात्र, आता मी माझ्या बहिणीला इतके सक्षम बनवेन की ती स्वतःचेच नव्हे, तर कुटुंबाचेही रक्षण करू शकेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्य सरकारने मुलींसाठी उच्च शिक्षण पूर्णपणे मोफत केले आहे. यामुळे मुली शिक्षणात मोठी प्रगती करत आहेत. महिलांची प्रगती होण्यापासून कोणीही थांबवू शकणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.

## देशभरातील ३३४ पक्षांना यादीतून हटवले

आयोगाने पुढे म्हटले आहे की, हे पक्ष आता लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ मधील कलम २९बी आणि कलम २९ सी तसेच निवडणूक चिन्ह आदेश १९६१ मधील तरतुदींनुसार कुठलाही लाभ घेण्यास अपात्र असतील. आता या आदेशाबाबत आक्षेप असलेला कुठलाही पक्ष ३० दिवसांच्या आत आयोगामध्ये आव्हान देऊ शकतो.

दरम्यान, या पक्षांना यादीमधून हटवणे हा निवडणूक आयोगाच्या व्यापक धोरणाचा भाग आहे. याअंतर्गत केवळ कादोपत्री अस्तित्व असलेल्या आणि प्रत्यक्षात सक्रिय नसलेल्या पक्षांना हटवले जात आहे. जून २०२५ मध्ये निवडणूक आयोगाने या मोहिमेची सुरुवात केली होती. तसेच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधील मुख्य निवडणूक आयुक्तांना वरील अटींची पूर्तता करण्यासंदर्भात ३४५ पक्षांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते.

## स्थानिक निवडणुकीत अद्याप आघाडी नाही

चर्चा होत असते. दरम्यान, मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे. मुंबई वाचवण्यासाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र भूमिका घेण्याचं ठरवले असेल तर देशातील, राज्यातील मराठी जनतेला त्याचा आनंदच होईल. राज ठाकरे यांनी परप्रांतीयांविरोधात कोणतीही भूमिका घेतली नाही. कधीकाळी शिवसेनेवरही हे आरोप होत होते. महाराष्ट्रात राहणाऱ्याला मराठी बोलता आले पाहिजे. भाषेसंदर्भात आंदोलन सध्या पश्चिम बंगालमध्येही सुरू आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी भाषा आंदोलन सुरू केले आहे. तामिळनाडूतही हेच आंदोलन सुरू आहे. तुम्ही केवळ महाराष्ट्र आणि मराठी माणसांवरच आक्षेप का घेताय..मराठी बोलणार नाही असं सांगितले जाते तेव्हा त्यांच्याविषयी लोकांच्या रागाचा भडका उडतो हे स्वाभाविक आहे असं सांगत राऊतांनी मनसेच्या भूमिकेच्या समर्थन केले.

### आम्हाला अक्कल शिकवू नये

- ज्यांनी बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फोडण्याचं पाप केले. मराठी माणसांची संघटना फोडून नजराणा शाहांच्या पायाशी टाकला त्यांनी आम्हाला स्वाभिमान शिकवू नये. आम्ही आमच्या अटीशर्तीवर दिल्लीत जातो. आम्ही कुणाची लाचारी करत नाही. लाचारी करत नाही म्हणून आम्ही भारतीय जनता पार्टीला झिडकारून स्वतंत्र भूमिका घेतली. अमित शाहांनी अपमानित केले. आम्हाला लाचारी करायची असती तर तुमच्या मागे फरफटत फिरलो असतो. त्यामुळे फडणवीसांनी आम्हाला अक्कल शिकवू नये, असं सांगत खा. राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला.

## राजीनामा दिल्यानंतर उपराष्ट्रपती धनखड बेपत्ता

निवासस्थानीही नाहीत. तुम्ही त्यांचा पत्ता लावा, जेणेकरून मी तिथे जाऊन त्यांची भेट घेईन असंही सिब्बल यांनी मागणी केली आहे.प्रकृतीचे कारण देत जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा अचानक राजीनामा दिला. २२ जुलैपासून हे पद रिक्त आहे. धनखड यांचा कार्यकाळ ऑगस्ट २०२७ पर्यंत होता, मात्र मुदतीच्या २ वर्ष आधीच ते पदावरून दूर झाले. निवडणूक आयोगानेही उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबरला निवडणूक घेण्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी नामांकन प्रक्रिया सुरू झाली आहे. येत्या २१ ऑगस्टपर्यंत या पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा आहे. अर्ज मागे घेण्याची तारीख २५ ऑगस्ट आहे. त्यात जगदीप धनखड यांच्या गायब होण्यावरून विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे. दिल्ली दौऱ्यावर गेलेले उद्धव ठाकरे यांनीही धनखड कुठे आहेत, असा प्रश्न पत्रकार परिषदेत केला होता.